अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज )कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ/साप्रवि/आस्था/४८०१
दिनांक :- १३/१०/२०२०

## -: आदेश :-

विषय :- श्री. शिवाजी लंके, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) तथा प्रभारी अधिक्षक अभियंता भवन रचना विभाग यांचे रजाकालावधीत त्यांचेकडील पदाच्या कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- १) भवन रचना कार्यालय जा.क्र. भवन/१२३४, दि. ५/१०/२०२०.
२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/३५७, दि. १२/१०/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. शिवाजी लंके, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) तथा प्रभारी अधिक्षक अभियंता भवन रचना विभाग यांनी वैद्यकीय रजा मंजूर करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये अर्ज सादर केला आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

श्री. शिवाजी लंके यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) तथा प्रभारी अधिक्षक अभियंता भवन रचना विभाग या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. शेंडे संजय यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी त्यांचे पदाचे कामकाज सांभाळून वरीलप्रमाणे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त पदभार स्वीकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी . . .